सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना राज्य शासनाच्या मंजूर दर कराराप्रमाणे वाहन भाड्याने घेण्यास मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

शासन निर्णय क्रमांकः सनिप्रा-२०१६/प्र.क्र. १०४/१३-स

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
तारीखः २४ जानेवारी, २०१८.

<u>वाचा :</u>

१) सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय क्रमांक.सववि३११३/प्र.क्र.७२/आस्था-१, दि.३१/१०/२०१३
२) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय क्रमांक सनिप्रा २०१५/प्र.क्र.२४/१३स, दि.०३/०३/२०१५
३) सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. रासनिप्रा/संवका/निवडणूक/ वाहनखरेदी ४२९४/२०१६, दि.०१/०८/२०१७
४) सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. रासनिप्रा/आस्थापना/वलि/वाचा पदे भरण्याबाबत.

<u>प्रस्तावना :</u>

राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणूका घेण्यासाठी व त्यावर देखरेख / नियंत्रण ठेवण्यासाठी दिनांक ३०/०३/२०१३ च्या अधिसूचनेद्वारे राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाची स्थापना झालेली आहे. वाचा क्र. १ येथील दिनांक ३१ ऑक्टोबर २०१३ चे शासन निर्णयानुसार सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे या पदाची निर्मिती करुन संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये त्यांना विभाग प्रमुख म्हणून घोषित करण्यात आले. सदर पद हे प्रतिनियुक्तीचे पद असून अपर निबंधक, सहकारी संस्था, या पदावर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांकडून भरण्यात येते. या पदाची वेतनश्रेणी पी. बी. रु. ३७४००-६७००० ग्रेड वेतन रु. ८७०० इतके असून या पदावर कार्यरत असलेल्या कार्यालयात वाहन अनुज्ञेय आहे. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या सचिवांना कार्यालयीन कामकाजासाठी, तसेच, निवडणूक कामी राज्याच्या विविध भागात दौरे करणे आवश्यक असते. परंतु प्राधिकरणाचे सचिव यांना शासकीय वाहन शासनाकडून उपलब्ध झालेले नसल्यामुळे अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे सद्यस्थितीत शासकीय वाहनाची अत्यंत आवश्यकता आहे. त्यामुळे सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, पुणे यांच्या वाचा क्र. ३ येथील नविन वाहन उपलब्ध करुन देण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, पुणे यांच्या वाचा क्र. ३ येथील प्रस्तावाच्या अनुषंगाने सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, पुणे यांना निधी उपलब्धतेच्या तसेच वाहन

भाड्याने घेण्याच्या खर्चात वेळोवेळी वित्त विभाग, व्यय शाखेच्या मान्यता घेण्याच्या अटीच्या अधीन राहून व विहित पद्धतीने वाहन (जीप) भाड्याने घेण्यास शासन आदेशान्वये मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या पुनर्विनियोजनास मान्यता देण्याबाबतचा अनौपचारिक संदर्भ क्र. अनौसं ५५२/२०१७/विनियम, दि. २७/११/२०१७ अन्वये दिलेल्या सहमतीने त्याचप्रमाणे राज्यस्तरीय वाहन आढावा समितीने दिलेल्या सहमती/मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१२५१५३५१३८३०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ramesh Shankarrao Shingte

Digitally signed by Ramesh Shankarrao Shingte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co- Operation, Marketing And Textile Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fed1b2ed6e1e4aca719170d9eae8aa251ee28dc56c75d8a65acb34103d45bd48, cn=Ramesh Shankarrao Shingte
Date: 2018.01.25 15:39:07 +05'30'

(रमेश शिंगटे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
२. महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
३. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, जूनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, ५ बी.जे. रोड, पुणे.
५. वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे.
६. वित्त विभाग (अर्थसंकल्प-१३/व्यय-२) मंत्रालय, मुंबई ३२
७. प्रधान सचिव (सहकार) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
८. कक्ष अधिकारी, कार्यासन १७-स, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. निवडनस्ती.